" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

स्थापना १९४४

ज्योतिर्विद्या परिसंस्था पुणे

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

सन १९६२-६३ ※ वर्ष १९ वें

## वार्षिक-वृत्तान्त व समाव्यय

[ पुढील वर्षाच्या निकल्पासह ]

[वार्षिक निकाय सभेचें निमंत्रण–मलपृष्ठ २ पाहावें ]


प्रकाशक

मो. ना. गोखले, B. Sc.

स. ग. काजरेकर, B. Sc.

कार्यवाह



मो. ना. गोखले

कार्यवाह, ज्योतिर्विद्या

परिसंस्था,

लो. टिळक स्मारक मंदिर, पुणें २.


बुक-पोस्ट

श्री. रा. रा.

## वार्षिक निकायसभेचें निमंत्रण

चालू वर्षाची म्हणजे २० व्या वर्षाची **निकायसभा**( General Body Meetiug ) **रविवार दि. २०-१०-६३** ला सायंकाळीं ४॥ वाजतां महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या सभागृहांत ( कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मीपथ ) भरेल. त्या वेळीं पुढील क्रमणिकेंत दिलेलें कामकाज होईल. तरी सर्व सभासदांनीं सभेस अवश्य उपस्थित राहावें ही विनंति.

### क्रमणिका

( १ ) दिवंगत सभासदांविषयीं दुखवटा.
( २ ) गतवर्षाच्या ( १९६२-६३ ) निकायसभेच्या इतिवृत्तास मान्यता.
( ३ ) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधानें गतवर्षांतील कार्याचें निवेदन.
( ४ ) गतवर्षीच्या समाव्ययास मान्यता.
( ५ ) नवीन वर्षाकरितां ( १९६३-६४ ) पदाधिकाऱ्यांची निवड.
( ६ ) घटनादुरुस्तीचा ठराव.
[ परिसंस्थेच्या घटनेंतील कलम ३, -सदःस्थता- या कलमांत **' संस्था सदःस्थ '** या आणखी एका वर्गाचा अन्तर्भाव करण्यासंबंधीं ठराव मांडण्यांत येणार आहे. ]
( ७ ) १९६३-६४ मध्यें संस्थेनें हातीं घ्यावयाचीं कामें.
( ८ ) ,, ,, च्या निकल्पावर चर्चा.
( ९ ) आयत्या वेळचे विषय. ( अध्यक्षांच्या अनुमतीनें )
(१०) प्राध्यक्षांचें भाषण.
(११) आभार.

आपले,

**मो. ना. गोखले**
**स. ग. काजरेकर**
कार्यवाह

पुणें, दि. १० ऑक्टोबर १९६३

**टीप**—सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील, अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं सभेपूर्वी निदान ३ दिवस अगोदर कार्यवाह यांच्याकडे तसें लेखी कळवावें.

सभेस अगत्यपूर्वक उपस्थित राहावें.

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

**" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "**

[ स्थापना : गणेशचतुर्थी, शके १८६६ दि. २२-८-१९४४ ]

## सन १९६२-६३ चा ( १९ व्या वर्षाचा ) वृत्तान्त

**प्रिय सदःस्थ व संस्थेचे हितचिंतक,**

दिनांक ३० जून १९६३ ला संपणाऱ्या, संस्थेच्या १९ व्या वर्षाचा हा वार्षिक-वृत्तान्त व समाव्यय आवश्यक त्या पत्रकांसह आपणापुढें सादर करण्यास आम्हास आनंद होत आहे. या अहवालावरून सहज दृष्टि फिरविल्यास आपल्या ध्यानांत येईल कीं संस्थेची उपयुक्तता व संस्थेचें कार्य आतां वाढत आहे. संस्थेला या वर्षी, कार्यालयासाठीं लोकमान्य टिळक स्मारक मंदिरासारख्या स्फूर्तिदायक वास्तूंत जागा मिळाली, ही या दृष्टीनें एक उल्लेखनीय घटना होय. आतां आपलें दैनंदिन कार्य, अभ्यास मंडळ, विविध समित्यांच्या सभा, ग्रन्थालय, तसेंच आकाश निदर्शनें वगैरे कार्यक्रमाकरितां जागेची पुष्कळच चांगली सोय झाली आहे. याप्रमाणें प्रगतिपथावर असणाऱ्या आपल्या संस्थेनें आतां विसाव्या वर्षांत पदार्पण केलें आहे, ही आपणां सर्वांच्या समाधानाचीच गोष्ट असणार.

**वृत्तान्त वर्षांतील पदाधिकारी**

**प्रसाशक मंडळ**–[ Governing Council ] गतवर्षारंभीच्या निकायसभेनें ( General Body ), १९६२-६३ साठीं प्रशासक-मंडळावर पुढील सन्मान्य सदःस्थांची निवड केली होती :–

**प्राध्यक्ष** :–प्रा. डी. डी. कापडिआ, एम्. ए., बी. एस्सी., आय्. ई. एस्. ( निवृत्त )

**अध्यक्ष** :–प्रि. गो. रा. परांजपे, एम्. एस्सी., एफ्. एन्. आय्., ओ. बी. ई.

**उपाध्यक्ष** :–डॉ. मो. वा. चिपळूणकर, एम्. एस्सी, डी. एस्सी. विज्ञान विभाग प्रमुख, पुणें विद्यापीठ

**नैधिक** :–प्रा. स. वि. आपटे, एम्.ए., बी. एस्सी., बी. ई. एस्. ( निवृत्त )

**कार्यवाहः**–( १ ) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.
( २ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.

**सदःस्थः**– ( १ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय, एम्. ए., बी. इ. एस्., ( निवृत्त )
( २ ) श्री. शं. ना. हरीप
( ३ ) श्री. द. गो. फडके, बी. ए., एल. एल्. बी
( ४ ) श्री. वि. धों. गोरेशास्त्री,
( ५ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.
( ६ ) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
( ७ ) प्रा. ज. ब. कुमठेकर, एम्. ए., बी. एस्सी., बी. टी.
( ८ ) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.
( ९ ) श्री. वि. वि. मोडक, जी. डी. सी., जी. सी. सी.
(१०) श्री. य. रा. नेने, एम् एस्सी., असि. मीटिऑरॉलॉजिस्ट
(११) श्री. त्र्यं. ब. अभ्यंकर, बी. ए. ( ऑनर्स ), गीर्वाणभूषण.

**अधीक्षक** [ अन्तर्गत समान्वय-निरीक्षक ] :–श्री. ल. के. तांबे, हेडक्लार्क व अकौन्टन्ट, अहिल्यादेवी हायस्कूल, पुणें.

**तद्विद्य मंडळ** [ Academic Council ]

( १ ) प्रि. गो. रा. परांजपे
( २ ) प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर
( ३ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय
( ४ ) प्रा. स. वि. आपटे
( ५ ) प्रा. ना. म. आठवले
( ६ ) प्रा. द. श्री. जोग
( ७ ) प्रा. ज. ब. कुमठेकर
( ८ ) श्री. मा भ. पन्त ( निमंत्रक )



## वृतान्तवर्षांतील सभा

**प्रशासक मंडळाच्या सभा** :– या वर्षांच्या कालखंडांत प्रशासक मंडळाच्या एकूण तीन सभा झाल्या.

- पहिली सभा, रवि. दि. १७-७-६२ ला झाली. या सभेमध्यें १९६१–६२ च्या कार्याचा ' वृतान्त व समान्वय ' प्रकाशनासाठीं संमत करण्यात आला.
- दुसरी सभा रवि. दि. २१-१०-६२ ला झाली. या सभेंत तद्विद्य मंडळाची निवड झाली व आगामी वर्षीं करावयाच्या कामाचा आराखडा ठरला.
- तिसरी सभा रवि. दि. ९-६-६३ ला झाली. झालेल्या कामाचा आढावा या सभेमध्ये घेण्यांत आला.

**तद्विद्य मंडळाची सभा**–रविवार दि. १८–११–६२ ला झाली. त्या वेळीं, **डिपार्टमेन्ट ऑफ् अेक्स्टेन्शन सर्व्हिसेस** यांनीं योजिलेल्या **सायन्स-फेअर**मध्यें परिसंस्थेने करावयाच्या व्याख्यानांची आखणी करण्यांत आली.

—०—

## आकाशनिदर्शनें

आजपर्यंत ज्योतिर्विद्या परिसंस्था केवळ पुण्यामध्येंच आकाश निदर्शनांचे कार्यक्रम करीत असे. यावर्षीं मात्र पुण्याबाहेरहि हे कार्यक्रम करून परिसंस्थेनें आपलें कार्यक्षेत्र वाढविलें आहे. आकाशनिदर्शनाचे अनेक कार्यक्रम जसें शैक्षणिक संस्थांसाठीं झाले तसेंच नागरिकांसाठींहि कांहीं कार्यक्रम योजिले होते. या कार्यक्रमांच्या वेळीं नित्याप्रमाणें, प्रमुख ताऱ्यांची ओळख करून देणें, भगोलाची निबंधनें समजावून देणें, ग्रह, आकाशगंगा, दीर्घिका–अभ्रिका यासंबंधीं माहिती सांगणें हा प्रमुख भाग असे. आवश्यक तेथें दूरादर्शाचें साह्यहि घेतलेलें होतें. या वर्षीच्या आकाशनिदर्शनांतील वैशिष्ट्य म्हणजे, अमेरिकेनें प्रक्षेपित केलेल्या–नुसत्या डोळयांनीं दिसणाऱ्या ' एको–१ ' या उपग्रहाचें अनेकदां घडविलेलें दर्शन हें होय. या वेळीं एको–१ विषयींची विविध माहिती उपस्थितांना सांगण्यांत आली. त्याच प्रमाणें मानवनिर्मित उपग्रहांचें प्रक्षेपणतन्त्र, व प्रगत राष्ट्रांत एतद्-विषयक चालू असलेलें कार्य या महत्वाच्या विषयासंबंधीं सामान्य माहिती सांगितली गेली. एको–१ संबंधींचें भाषण व लेख यांचा उल्लेख या वृत्तांतांत पुढे आढळेलच.

वृत्तात वर्षीच्या आकाशनिदर्शनांचें टिपण खालील कोष्टकांत दिलें आहे.

## स्थानिक आकाशनिदर्शनें

| क्रमांक | दिनांक व वेळ | स्थळ | विशेष |
| --- | --- | --- | --- |
| १. | ७–११–६२ पूर्वरात्रीं | 'लक्ष्मण भुवन'ची गच्ची | उपस्थितांना एको–१ दाखविण्यांत आला. कार्यक्रम वृत्तपत्रांतून आधीं प्रसिद्ध केला होता. सुमारें १५० जिज्ञासु मंडळी उपस्थित होती. |
| २. | ८–११–६२ पूर्वरात्रीं | ,, | ,, ,, |
| ३. ४. ५. ६. ७. ८. ९. १०. | १–१२–६३ पूर्वरात्रीं व २–१२–६३ पहाटें | १) रास्तापेठ एज्यु. सो. चें हायस्कूल २) अहल्यादेवी हायस्कूल ३) नूतन मराठी विद्यालय ४) मॉडर्न हायस्कूल | हे कार्यक्रम **डिपार्टमेंन्ट ऑफ् एक्स्टेन्शन सर्व्हिसेस** च्या वतीनें भरलेल्या **सायन्सफेअर**मध्यें योजिले होते. परिसंस्थेचें निदर्शक या चारी शाळांमधून गेले होते. दोन्ही दिवशीं हवामान आकस्मिकपणें प्रतिकूल झाल्यानें, कार्यक्रमांचें स्वरूप कांहीं प्रमाणांत बदलावें लागलें. |
| ११. १२. | १६–२–६३ पूर्वरात्रीं १७–२–६३ पहाटें | प्रोग्रेसिव्ह एज्यु. सो. चे मुलींचे हायस्कूल | दोन्ही वेळीं ११ वी च्या सुमारें १०० विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रम, मुख्याध्यापिका यांच्या विनंतीवरून योजिला होता. |
| १३ | २१–२–६३ पूर्वरात्रीं | सेन्ट जॉन्स हायस्कूल | ११ वी चे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापकांच्या विनंतीवरून योजिलेला कार्यक्रम. |
| १४ | २९–४–६३ पूर्वरात्रीं | लक्ष्मी पथावरील बोरावके बिल्डिंग | विशेषतः शहराच्या पूर्वभागांतील नागरिकांसाठीं हा कार्यक्रम पूर्वप्रसिद्धीसह घडवून आणला. उपस्थितांना एको–१ दाखविला, सुमारें ७५ नागरिक उपस्थित होते. |
| १५ | | श्री. मुः कृ. देशपांडे, यांच्या कर्वे पथावरील बंगल्याची गच्ची | परिसंस्थेचे सदःस्थ श्री. देशपांडे, यांच्या विनंतीवरून, त्यांच्या स्नेही मंडळींच्याकरतां हा कार्यक्रम योजिला होता. उपस्थिति २५–३०. |



## परगांवचीं आकाशनिदर्शनें

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| १६ | १–१२–६२ पूर्वरात्रीं | नगर येथील ए. ई. एस्. हायस्कूल | |
| १७ | ,, | सातारा येथील न्यू इं. स्कूल | |
| १८ | २–१२–६२ पहाटें | नगर, ए. ई. एस. हायस्कुल | वरीलप्रमाणें **सायन्सफेअर** च्या अनुषंगानें योजिलेलें. |
| १९ | २–१२–६२ पहाटें | सातारा न्यू इं. स्कूल | |
| २० | २९–१२–६२ पूर्वरात्रीं | संजीवनी विद्यालय पांचगणी | शाळेच्या मुख्याध्यापकांच्या विनंतीवरून हे कार्यक्रम घडवून आणले. |
| २१ | ३०–१२–६२ पहाटें | ,, | |

वरील कार्यक्रमांच्या कामीं, श्री. य. रा. नेने, श्री. मा. भ. पन्त, श्री. वि. वि. मोडक, श्री. स. चिं. मराठे, श्री सु. शं. गोडबोले, श्री. स. ग. काजरेकर, व श्री. मो. ना. गोखले या सर्वांचें साह्य झालें.

## अभ्यास मंडळ

अभ्यासमंडळाचें कार्य या वर्षीहि जोरांत चालू होतें. मंडळाच्या एकंदर १३ बैठकी झाल्या. त्यांचा त्रोटक वृत्तान्त पुढील प्रमाणें

| क्र. | दिनांक | विषय | प्रमुख प्रतिपादक |
|---|---|---|---|
| १ | १४-७-६२ | दिवाळी आणि ईस्टर यांची तारीख काढणें ( नसरापूर येथील मिशनरी रेव्ह. क्रोझिअर यांच्या विशेष विनंतीवरून ही चर्चा नियोजित केली होती. ) | श्री. त्र्यं. ब. अभ्यंकर |
| २ | २३-९-६२ | सापेक्षता सिद्धांताचें गणित | श्री. अ. त्र्यं. ढवळे |
| ३ | ४-११-६२ | " " " | " |
| ४ | १८-११-६२ | तद्विद्यमंडळ व अभ्यासमंडळ संयुक्तसभा | |
| ५ | ६-१-६३ | वर्णावलि व ज्योतिर्वास्तव | श्री. मा. भ. पन्त |
| ६ | २०-१-६३ | " " " | " |
| ७ | २६-१-६३ | संख्याशास्त्र व ग्रहस्थिति | श्री. गो. वि. चौधरी |
| ८ | ३-२-६३ | वर्णावलि व ज्योतिर्वास्तव (पुढें चालूं) | श्री. मा. भ. पन्त |
| ९ | १०-२-६३ | " " " | " |
| १० | २४-२-६३ | " " " | " |
| ११ | २१-४-६३ | क्षयमास | श्री. त्र्यं. ब. अभ्यंकर |
| १२ | २३-६-६३ | मेजर गद्रे यांनीं गणितशास्त्रांत, केलेल्या कांहीं संशोधनाविषयीं | मे. ना. बा. गद्रे |
| १३ | ३०-६-६३ | | " |

## व्याख्यानें व लेख

अ ) शाळांमधून झालेल्या आकाशनिदर्शनांच्या अनुषंगानें, निदर्शनापूर्वीं विषयाची पूर्वपीठिका समजावून देण्यासाठीं, मूर्तकांच्या साह्यानें वर्गामध्यें पुढीलप्रमाणें व्याख्यानें झालीं.

| क्र. | दिनांक | स्थळ | व्याख्याते |
|---|---|---|---|
| १ | १–१२–६२ | मॉडर्न हायस्कूल, पुणें | श्री. स. ग. काजरेकर |
| २ | १–१२–६२ | ए. ई. एस्. हायस्कूल, नगर | श्री. मा. भ. पन्त |
| ३ | २९–१२–६२ | संजीवनी विद्यालय, पांचगणी | श्री. मो. ना. गोखले |
| ४ | १६–२–६३ | प्रोग्रे० एज्यु० सो० चे मुलींचे हायस्कूल, पुणें | श्री. मो. ना. गोखले |

आ ) परिसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीं अन्य संस्थांच्या निमंत्रणांवरून ज्योतिष्यकीय विषयावर खालीलप्रमाणें व्याख्यानें दिलीं.



| क्र. | दिनांक | विषय/संस्था | व्याख्याते |
|---|---|---|---|
| ५ | २–७–६२ | क्षयमास केव्हां व कोणता ( भारत इति० सं० मंडळ, पुणें २. ) | श्री. त्र्यं. ब. अभ्यंकर |
| ६ | ६–८–६२ | ऋग्वेदांतील ज्योतिःशास्त्र ( दे. ऋ. ब्रा. शिक्षणोत्तेजक संस्था पुणें २. ) | " " |
| ७ | ५–५–६३ | * मानवनिर्मित उपग्रह, एको–१ | श्री. मो. ना. गोखले |
| ८ | १२–५–६३ | * १ ) ॲटॉमिक रिॲक्टर्स, व * २ ) अवकाशयान, "फ्रेन्डशिप्–७" या चित्रपटांतील विषयांचें पूर्व विवेचन | " " |

* ( वासंतिक शास्त्रीय व्याख्यानमाला म. औ. संग्रहालय, पुणें २. )

इ ) मानवनिर्मित उपग्रहासंबंधीं वाढीस लागलेली जिज्ञासा विचारांत घेऊन, नुसत्या डोळ्यांनी दिसणारा अमेरिकेचा उपग्रह "एको–१" यासंबंधीं जिज्ञासूंना अधिक निश्चित व खुलासेवार माहिती पुरविण्याच्या उद्देशानें **श्री. स. ग. काजरेकर** यांनीं, **सृष्टिज्ञान** मासिकाच्या डिसेंबर १९६२ च्या अंकामध्यें या विषयावर एक लेख लिहिला.

श्री. काजरेकर व श्री. गोखले यांनीं बरेच दिवस या उपग्रहाचे निरीक्षण करून त्याच्या गतीचा अभ्यास केला. निरीक्षणावर आधारित गणिताप्रमाणें दृक्-प्रत्यय मिळतात असें त्यांच्या अनुभवास आलें. परिसंस्थेच्या अभ्यासमंडळांतील सदस्यांच्या समवेत, कांहीं निरीक्षणाच्या वेळीं या विषयावर चर्चा झाली. त्याच प्रमाणें स्थानिक व पुण्याबाहेरील कांहीं जिज्ञासू व्यक्तींनीं या उपग्रहाविषयीं माहिती विचारली होती; ती त्यांना पुरविण्यांत आली.

## विशेष व्याख्यानमाला

( १ ) **डायरेक्टोरेट ऑफ् अेक्स्टेन्शन प्रोग्रॅम्स फॉर सेकंडरी एज्युकेशन** (नॅशनल कौंसिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग ) यांचे स्थानिक पदाधिकारी, टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनचे सन्माननीय प्रिन्सिपॉल, यांनीं योजिलेल्या '**सायन्स फेअर**' च्या कार्यक्रमांत परिसंस्थेनें संपूर्ण व महत्त्वाचें सहकार्य दिलें. यावेळीं माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठीं योजिलेल्या व्याख्यानमालेंत परिसंस्थेच्या अधिकारी व्यक्तींचीं झालेलीं पुढील व्याख्यानें हा या वर्षीचा विशेष उल्लेखनीय कार्यक्रम होय.

हीं व्याख्यानें म. ए. सोसायटीच्या भावेस्कूल ( पेरुगेट ) च्या सभागृहांत रविवार दि. १–१२–६२ या दिवशीं झालीं; त्यांचा तपशील :

| क्र. | वेळ | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| १ | सकाळीं ८ ते ९-३० | **भगोलदृश्य, नक्षत्रें व राशी** | **प्रा. मो. ल. चंद्रात्रेय** एम्. ए. |
| २ | ,, ९-३० ते ११ | **सूर्य व सूर्यकुल** | **प्रा. ज. ब. कुमठेकर** एम्. ए., बी. एस्. सी. |
| ३ | दुपारीं २-३० ते ४ | **तारे, आकाशगंगा, तेजोमेघ व विश्व** | **प्रि. गो. रा. परांजपे** एम्.एस्सी., एफ्.एन्.आय्., ओ. बी. ई. |
| ४ | ,, ४ ते ५-३० | **कृत्रिम उपग्रह व त्यांचे उपयोग** | **डॉ. मो. वा. चिपळूणकर** एम्.एस्.सी.,डी.एस्.सी. |

व्याख्यानांच्या वेळीं विषयाच्या विवेचनानंतर प्रश्नोत्तरें व चर्चा याकरितां वेळ राखून ठेवला होता. चर्चा उपयुक्त झाली.

( २ ) दुसरी व्याख्यानमाला, मंगलूर येथील ऋग्वेदाचे अभ्यासक **श्री. राघवेन्द्रराव उद्यावर** यांनी "**ऋग्वेदांतील ज्योतिःशास्त्र**" या विषयावर गुंफली. हीं व्याख्यानें दि. २८-२-६३ ते १-३-६३ पर्यंत चार दिवस झाली. या व्याख्यानमालेसाठीं न्यू. इं. स्कूल ( रमणबाग ) या शाळेचें सभागृह, मुख्याध्यापकांच्या सौजन्यानें मिळालें होतें.

## विशेष कार्यक्रम

**(१) ग्रंथप्रकाशन व लेखकाचा सत्कारः**–वैदिक वाङ्मयाचे गाढे अभ्यासक **श्री. अ. ज. करंदीकर,** यांनीं लिहिलेल्या "**वैदिक आर्यांचें ज्योतिर्विज्ञान आणि वैदिक देवतांचें पुनर्दर्शन**" या संशोधनपर ग्रंथाचा प्रकाशनसमारंभ व लेखकांचा सत्कार, **महामहोपाध्याय प्रा. काशिनाथ वासुदेव अभ्यंकर** यांच्या अध्यक्षतेखालीं घडवून आणला. हा कार्यक्रम दि. २-९-६२ ला, महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या सभागृहांत पार पडला.

**( २ ) USIS चे शास्त्रीय चित्रपट :–**

युनाइटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिस च्या सहकारानें परिसंस्थेचे सद:स्थ



आणि निमंत्रित यांच्यासाठीं दि. २६ जून १९६३ ला पुढील ४ शास्त्रीय चित्रपट दाखविण्यांत आले :–

( 1 ) Our Nearest Star
( 2 ) The Force of Gravity
( 3 ) Magnetic Force
( 4 ) Shape of The Earth

या कार्यक्रमासाठीं महाराष्ट्र एज्यु. सोसायटीचें मुलांचें हायस्कूल, पेरूगेट या शाळेचे सभागृह मुख्याध्यापकांच्या सौजन्यानें मिळालें होतें.

## संस्थेस मिळालेल्या देणग्या

या वर्षीं संस्थेस खालीलप्रमाणें देणग्या मिळाल्या :–

( १ ) रेव्ह. जे. पी. फ्रोझिअर, नसरापूर यांचेकडून रु. २०/–
( २ ) श्री. अजित त्र्यंबक ढवळे यांनीं आपल्या तीर्थरूपांचे स्मरणार्थ गतवर्षाप्रमाणेंच याहि वर्षीं रु. २५/– ची देणगी दिली.

## ग्रन्थसंग्रहांत पडलेली भर

1. What is Relativity–Landau
2. Space Twins–Y. Dokuchayev & Gherman Titov
3. Indivitual & The Universe–
4. The Universe–Sc. American Book.
5. The Realms of Nebulae–Hubble
6. The Biography of Physics–George Gamow
७. वैदिक आर्यांचें ज्योतिर्विज्ञान आणि वैदिक देवतांचें पुनर्दर्शन –श्री. अ. ज. करंदीकर
८. अस्य वामस्य सूक्तम्–प्रा. र. वि. वैद्य
९. वेदांग ज्योतिष–संख्याशास्त्र–श्री. गो. वि. चौधरी

प्रतिवर्षाप्रमाणें रॉयल ऑब्झर्व्हेटरी बेल्जिअम यांचीं प्रकाशनें व संशोधनविषयक प्रबंध परिसंस्थेकडे आले आहेत.

इम्पीरिअल केमिकल इन्डस्ट्रीज लंडन यांचें शास्त्रीय नियतकालिक "एन्डेव्हर" या वर्षापासून आपणाकडे येऊं लागलें आहे.

## परिसंस्थेच्या प्रकाशनांची विक्री :

या विषयीं संपूर्ण माहिती हिशोबाच्या पत्रकांत दिली आहेच. या वर्षीहि

प्रकाशनांना चांगली मागणी आली होती.

## नवसदःस्थांचें अभिनंदन :

वृत्तान्तवर्षीं खालील सद्गृहस्थ परिसंस्थेचे सदस्य झाले,

( १ ) श्री. भालचंद्र विष्णु सोमण, बी. एस्‌सी. एम्. एड्.
( २ ) प्रा. दत्तात्रेय विनायक बडवे, एम्. एस्‌सी.
( ३ ) श्री. अनंत विष्णु दातार, एम्. एस्‌सी.
( ४ ) श्री. शंकर सदाशिव राव, अर्काटकर, बी. एस्‌सी.
( ५ ) श्री. श्रीपाद गोविन्द फणसळकर, बी. ए.

## चिरवियोग :

प्रा. वा. म. दबडघाव व श्री. व. वि. साठे, इन्जिनिअर, या दोन हितचिन्तक व्यक्ति वृत्तान्तवर्षीं निधन पावल्या, याचा उल्लेख करण्यास आम्हास फार खेद होतो. अशी कळकळीची मंडळी आपल्यांतून गेल्यानें परिसंस्थेची हानि झाली आहे.

—०—

## आभार :

वरीलप्रमाणें परिसंस्थेच्या १९ व्या वर्षांतील कामाचा अहवाल आपणापुढें ठेविला आहे. त्यावरून संस्थेची प्रगति आपल्या नजरेला येईल. हे श्रेय प्राप्त करून देण्यास, संस्थेचे सर्व सदःस्थ व विज्ञानप्रेमी जनता हेच निःसंशय कारणीभूत आहेत. वर्षांतील विविध कार्यक्रमांच्या प्रसंगीं खालील संस्थांकरून बहुमोल सहकार व साह्य मिळाले :

( १ ) म. औ. संग्रहालय
( २ ) लक्ष्मण-भुवन, ब्राह्मण कार्यालय
( ३ ) म. ए. सो. मुलांचे हायस्कूल ( पेरुगेट )
( ४ ) न्यू इं. स्कूल ( रमणबाग )
( ५ ) युनाइटेड् स्टेट्स् इन्फर्मेशन सर्विस

परिसंस्था या सर्वांची ऋणी आहे.

लो. टिळकस्मारकमंदिराच्या विश्वस्तांनीं मंदिरांतील जागा, परिसंस्थेच्या कार्यालयासाठीं उपलब्ध करून दिली. परिसंस्थेवरील त्यांच्या प्रेमामुळेंच हें झालें



आहे. संस्थेचे अन्तर्गत अधीक्षक **श्री. ल. के. तांबे** व सरकारमान्य ऑडिटर्स **मेसर्स जी. डी. आपटे आणि कंपनी** यांनीं प्रतिवर्षाप्रमाणेंच परिसंस्थेचे हिशेब विनामूल्य व काळजीपूर्वक तपासून दिले. संस्थेवरील प्रेमाखातर त्यांनीं दिलेली ही एक नेहमींची देणगीच आहे असें म्हणणें इष्ट होईल. याचप्रमाणें अनेक संस्था व व्यक्ती यांचें आम्हास साह्य झालें. सर्वांचे हार्दिक आभार मानून हें निवेदन संपवितों

आपले,

पुणें; दिनांक २२–९–६३ मो. ना. गोखले स. ग. काजरेकर

**कार्यवाह**

## ज्योतिर्विद्या, परिसंस्था, पुणें.

### १ जुलै १९६२ ते ३० जून १९६३ अखेरचें आयव्यय पत्रक.

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| खातें | रु. नवे पैसे | खातें | रु. नवे पैसे |
| वर्गणी | २७९—०० | पगार | १९२—०० |
| अल्पदेणगीदारांकडून | ३७—२५ | जागा भाडें | १५०—०० |
| देणग्या | ४५—०० | टपाल | १९—७४ |
| संस्थेच्या प्रकाशनांची विक्री | ९२—६० | स्टेशनरी | ५६—४२ |
| | | कचेरी खर्च | १४७—३६ |
| व्याज | | व्याख्यानें, आकाश निदर्शनें, | |
| ( १ ) बँकेकडून. | १५७—०७ | अभ्यास मंडळ, इत्यादि | ४५—५१ |
| ( २ ) सरकारी ठेवीवरील | ३५—०० | पुस्तक विक्रीवरील सूट | ५—६७ |
| ३½% दराचे सरकारी रोखे | ५००—०० | वाहन खर्च | २—०७ |
| ( मुदत संपल्यानें वटवले ) | | ग्रंथसंग्रह | ४३—४८ |
| | | डेड्स्टॉक | ३६—१६ |
| | | फर्नीचर | २५४—०० |
| | | साहित्य संभार, उपकरणें | १०—०० |
| | १,१४५—९२ | | ९६२—४१ |
| वर्षारंभीची शिल्लक | | वर्षा अखेर शिल्लक | |
| ( १—७—६२ रोजी ) | | ( ३०—६—६३ रोजीं ) | |
| रोख | ५०—२० | रोख | २६२—८९ |
| बँकेत | ५,५९८—५५ | बँकेत | ५,५६९—३७ |
| एकूण | रु. ६,७९४—६७ | एकूण | रु. ६,७९४—६७ |

**स. वि आपटे**
**नैधिक**

परिसंस्थेच्यां अन्तर्गत **अधिक्षकांचा अभिप्राय :—**

I have checked the Accounts for the year ending 30 th June 1963 and found them correct.

sd/—L. K. Tambe
Internal Auditor



## ज्योतिर्विद्या, परिसंस्था, पुणें.

### १९६३—६४ सालचा निकल्प. ( बजेट )

| जमा | रु. नवे पैसे | खर्च | रु. नवे पैसे |
|---|---|---|---|
| वर्गणी | ७००—०० | पगार | २००—०० |
| देणग्या / अनुदान | १००—०० | ग्रन्थसंग्रह | २५०—०० |
| परिसंस्थेच्या प्रकाशनांची विक्री | १००—०० | साधनसंभार, उपकरणें | २५०—०० |
| व्याज | १००—०० | व्याख्यानें, आकाश-निदर्शनें इत्यादि. | २५०—०० |
| भांडवली खर्चासाठी अपेक्षित देणग्या | ८००—०० | कचेरी खर्च | ४००—०० |
| रिसर्च रिझर्व फंडां-तून काढावी लागणारी रक्कम | २००—०० | फर्नीचर | ३५०—०० |
| | | भाडें | ३००—०० |
| एकूण | रु. नवे पैसे २,०००—०० | एकूण | रु. नवे पैसे २,०००—०० |

टीप :—संस्थेची नवीं प्रकाशनें छापण्यासाठी देणग्या मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. संकल्पित प्रकाशनांचीं हस्तलिखितें तयार होईतों देणग्या न मिळाल्यास, त्या प्रकाशनांच्या छपाईसाठीं आवश्यक तो खर्च संस्थेच्या शिलकींतून करावा.

G. D, Apte & Co,
Chartered Accountants

with the Assistant Charity Commissioner, Poona
In the matter of Act XXIX of 1950
and
In the matter of

## JYOTIRVIDYA PARISANTHA POONA,

Public Trust
Public Trust No. F-44
Audit for the year ending 30th June 1963

We, the undersigned Auditors, hereby report that :

(a) The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the Rules;

(b) The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts;

(c) The cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;

(d) The books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by us were producцd before us;

(e) Inventory certified by the trustee of the movables of the public trust has not/has heen maintained;

(f) The manager or trustee appeared before us and furnished the necessary information required by us;

(g) The property or funds of the trust were not applied for any object or purpose other than the object or purpose of the trust;

(h) The amounts of outstandings for more than one year are Nil and the amounts written off are Rs. Nil.

(i) Tenders were / were not invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5,000-00 Not applicable.

(j) Any money of the public tsust has not been invested contrary to the provisions of Sec. 35.

(k) Alienations of the immovable property contrary to the provisions of Sec. 36 have not come to our notice.

United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2
Date 20th Sopt. 1963

Sd/ **G. D. APTE & CO**
Chartered Accountants
5-4-7

G. D. Apte & Co
Chartered Accountants
5/4/7

**Schedule VIII**
vide Rule 17 (1)

PHONE : 57872
United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2
Date 20th September 1963

Name of the Public Trust : **Jyotirvidya Parisanstha, Poona**

BALANCE SHEET as at 30th June 1963

| FUNDS AND LIABILITIES | | Rs. np. | ASSETS | | Rs. np. |
|---|---|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus : | | | Immovable Properties : | | |
| As per last B/S | | 2,483-25 | **Investments** | | |
| | | | 3% Treasury Saving | | |
| | | | Dep. Certificates ( Encashed ) | | |
| | | | **Library Books** | | |
| | | | As per last B/s | 283-38 | |
| | | | Additions during | | |
| | | | the year | 43-48 | |
| Other Earmarked Funds ; | | | | 326-86 | |
| Depreciation Fund | | | depreciation | 32-69 | 294-17 |
| Sinking Fund | | | | | |
| Reserve Fund | | | | | |
| Any other Fund | | | | | |
| | | | Furniture and Fixtures : | | |
| | | | As per last B/S | 246-37 | |
| | | | Add | 254-00 | |
| | | | | 500-37 | |
| | | | Less : Depre | 50--04 | 450-33 |
| | | | Loans (Secured or unsecured) : | | |
| Loans (Secured or unsecured) : | | | Equipments | | 46-16 |
| From Trustees | | | Other Loans | | |
| From Others | | | | | |
| | | | Advances ; | | |
| | | | To Trustees | | |
| | | | To Employees | | |
| | | | To Contractors | | |
| | | | To Lawyers | | |
| Liabilities : | | | To Others : Stock of Publi- | | |
| For Expenses | | | cations ( Books ) | | 2,571-52 |
| For Advances | | | Income Outstanding ; | | |
| For Rent and other Deposits | | | Rent | | |
| For Sundry Credit Balances | | | Interest | | |
| | | | Other Income | | |
| Income Outstanding | | | Cash and Bank Balance ; | | |
| (as per Contra) ; | | | (a) Bank Accounts | | |
| Rent | | 25-00 | (in the name of the Trust) | | |
| Interest | | | Cosmos Coop. Urban Bank | | |
| Other Ineome | | | Ltd. in S/B A/C | | 5,569-37 |
| | | | (b) With the Trustee | | 262-89 |
| | | | (c) With the Manager | | |
| Income and Expenditure A/c | | | | | |
| As per last B/S | 7,299-50 | | Income and Expenditure A/c | | |
| Less ; deficit | | | As per last B/S | | |
| as per I/E A/c | 613-31 | 6,686-19 | Add/Less ; Surplus or deficit | | |
| | | | as per I/E A/c | | |
| Total Rs. | | 9,194-44 | Total Rs. | | 9,194-44 |

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and Assets of the Trust.

Dated at Poona 20 Sept. 1963

Trustees Sd/ **M. N. Gokhale**
( Secretary )

Sd/ **S. V. Apte**
( Treasurer )

As per our report of even date

Sd/ **G. D. Apte & Co**
Charterd Accountants
Auditors

G. D. Apte & Co
Chartered Accountants
5/4/7

**Schedule IX**
vide Rule 17 (1)
Registered No. F–44

PHONE : 57872
United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2
Date 20th Sept. 1963

Name of the Public Trust : **Jyotirvidya Parisanstha, Poona**

Income and Expenditure Account for the year eding 30th June 1963

| EXPENDITURE | | Rs. np. | INCOME | | Rs. ap. |
|---|---|---|---|---|---|
| To Expenses in respect of Properties | | | By Rent Accrued), (Realised) | | |
| ,, Rates, Taxes, Cesses | | | | | |
| ,, Repairs & Maintenance | | | | | |
| ,, Salaries | | | By Interest (Realised) | | 192–07 |
| ,, Insurance | | | | | |
| ,, Depreciation (By way of Provision or adjustments) | | | On Securisies | 35–00 | |
| | | | On Loans | | |
| ,, Other Expenses | | | On Bank Accounts | 157–07 | |
| ,, Establishment Expenses | | 590-52 | | | |
| Salary | 192–00 | | | | |
| Rent | 175–00 | | | | |
| Postage | 19–74 | | | | |
| Stationery | 56–42 | | | | |
| Contingenecy | 147–36 | | | | |
| | 590–52 | | | | |
| ,, Remuneration to Trustees | | | By Dividend | | |
| ,, Remuneration ( In the case of a Math) to the head of the Math including his household expenditure, if any | | | By Donations in cash or kind | | 82–25 |
| | | | By Subscription | | 279–00 |
| | | | By Income from other sourees | | |
| To Legal Expenses | | | Sale of books | | 92–60 |
| To Audit Fees | | | | | |
| To Contribution & Fees | | | | | |
| To Amounts Written off | | | | | |
| (a) Bad debts | | | | | |
| (b) Loan Scholarships | | | | | |
| (c) Irrecoverable Rents | | | | | |
| (d) Other Items | | | By Transfers from Reserves | | |
| To Miscellaneous Expenses | | | By Deficit carried over to Balance Sheet | | 613–31 |
| To Depreciation | | 82–73 | | | |
| To Amounts Transferred to Research Reserve Funds | | 500–00 | | | |
| To Expenditure on Objects of the Trust | | | | | |
| (a) Religious | | | | | |
| (b) Educational | | 85–98 | | | |
| Cost of books sold | 32–73 | | | | |
| Lectures | 42–51 | | | | |
| Commission on sale of Books | 5–67 | | | | |
| Conveyance | 2–07 | | | | |
| | 85–98 | | | | |
| (c) Medical Relief | | | | | |
| (d) Relief of Poverty | | | | | |
| (e) Other charitable Objects | | | | | |
| To Surplus carried over to Balance Sheet | | | | | |
| Total Rs. | | 1,259–23 | Total Rs. | | 1,259–23 |

Dated at Poona 20th Sept. 1963
Trustees Sd / **M. N. Gokhale**
( Secretary )

Sd / **S. V. Apte**
( Treasurer )

As per our report of even date
Sd / **G. D. Apte & Co**
Chartered Accountants
Auditors